
नवीन अभ्यासक्रम

तृतीय वर्ष वाणिज्य

# भारतातील बँकविषयक कायदे आणि कार्यपद्धती

बँकव्यवसाय व वित्तपुरवठा : पेपर – ३


डॉ. डी. जी. उशीर
डॉ. श्रीमती बी. डी. पाटील
डॉ. आशालता सोनवणे
डॉ. आर. के. दातीर
एस. आर. जावळे


NIRALI PRAKASHAN
ADVANCEMENT OF KNOWLEDGE

तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या 'बँकिंग अॅन्ड फायनान्स' (स्पेशल पेपर - ३)
या विषयासाठी जून 2015 पासून सुरू झालेल्या सुधारित अभ्यासक्रमानुसार लिहिलेले पाठ्यपुस्तक !
तसेच 'बँकिंग'च्या विद्यार्थ्यांना उपयुक्त संदर्भ ग्रंथ !

# बँकव्यवसाय व वित्तपुरवठा
# भारतातील बँकविषयक कायदे आणि कार्यपद्धती

## BANKING LAW AND PRACTICES IN INDIA

## (पेपर क्र. 3)


* लेखक *

**प्रा. डॉ. डी. जी. उशीर**
सहयोगी प्राध्यापक (असोसिएट प्रोफेसर)
के. टी. एच. एम. महाविद्यालय
गंगापूर रोड, नाशिक.

**प्रा. डॉ. आर. के. दातीर**
असोसिएट प्रोफेसर व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
के. टी. एच. एम. महाविद्यालय
गंगापूर रोड, नाशिक.

**प्रा. डॉ. श्रीमती बी. डी. पाटील**
सहयोगी प्राध्यापिका (असोसिएट प्रोफेसर)
के. टी. एच. एम. महाविद्यालय
गंगापूर रोड, नाशिक.

**प्रा. एस. आर. जावळे**
सहयोगी प्राध्यापक (असोसिएट प्रोफेसर)
सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स
श्रीरामपूर (जि. अहमदनगर)

**प्रा. डॉ. आशालता सोनवणे**
साहाय्यक प्राध्यापिका
के. टी. एच. एम. महाविद्यालय
गंगापूर रोड, नाशिक.



**किंमत : ₹ ११०.००**

NIRALI PRAKASHAN
ADVANCEMENT OF KNOWLEDGE

N1769

**भारतातील बँकविषयक कायदे आणि कार्यपद्धती (पेपर क्र. ३)** **ISBN 978-93-5164-771-3**

प्रथम आवृत्ती : ऑक्टोबर २०१५

© **प्रा. डॉ. उशीर, प्रा. डॉ. दातीर, प्रा. जावळे, प्रा. डॉ. पाटील, प्रा. डॉ. आशालता सोनवणे**

■ **संपादक : प्रा. डॉ. डी. जी. उशीर**

**प्रकाशक**

**निराली प्रकाशन**

अभ्युदय प्रगती, १३१२, शिवाजीनगर,
जे. एम. रोड, पुणे – ४११ ००५
☎ (०२०) २५५ १२३३६/३७/३९
फॅक्स : (०२०) २५५ ११३७९ E-mail : niralipune@pragationline.com

**मुद्रक**

**स्टार कॉपिअर्स प्रा. लि.**

कुमठेकर रोड, सदाशिव पेठ,
पुणे – ४११ ०३०
☎ (०२०) २४४७ ९२०१

**बुक स्टॉल**

**मुंबई** : **प्रगती बुक कॉर्नर**
जैन भुवन, इंदिरा निवास, १११-अ, भवानी शंकर मार्ग, दादर, **मुंबई** – ४०००२८.
☎ २४२२ ३५२६ / ६६६२ ५२५४ E-mail : pbcmumbai@pragationline.com

**पुणे** : **प्रगती बुक सेंटर**
- १५७, बुधवार पेठ, **पुणे** – २. ☎ (०२०) २४४५ ८८८७ / ६६०२ २७०७.
- ६७६/ब, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिरासमोर, **पुणे** – २. ☎ (०२०) ६६०१ ७७८४
  E-mail : pbcpune@pragationline.com
- २८/अ, बुधवार पेठ, अंबर चेंबर्स, अप्पा बळवंत चौक, **पुणे** – २. ☎ (०२०) ६६२८१६६९.

**प्रमुख वितरक केंद्रे**

**निराली प्रकाशन :**

- **पुणे :**
  - ११९, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिर मार्ग, **पुणे** – ४११ ००२. ☎ (०२०) २४४५ २०४४, ६६०२ २७०८.
    फॅक्स : (०२०) २४४५ १५३८.
  - सर्वे नं. २८/२५ धायरी-कात्रज रोड, पारी कंपनीजवळ, **पुणे** – ४११ ०४१. ☎ (०२०) २४६९ ०२०४
    फॅक्स : (०२०) २४६९ ०३१६.
- **मुंबई :** ३८५, एस.व्ही.पी. मार्ग, रसधारा को. ऑप. हाउसिंग सोसायटी लि., गिरगाव, **मुंबई** – ४०० ००४.
  ☎ (०२२) २३८५ ६३३९/२३८६ ९९७६ फॅक्स : (०२२) २३८६ ९९७६. Email : niralimumbai@pragationline.com

**इतर वितरक**

- **निराली प्रकाशन**
  - **जळगाव** : ३४, व्ही. व्ही. गोलानी मार्केट, नवी पेठ, **जळगाव** -४२५ ००१. ☎ (०२५७) २२२ ०३९५
  - **कोल्हापूर** : न्यू महाद्वार रोड, केदारलिंग प्लाझा, पहिला मजला, आय.डी.बी.आय. बँकेसमोर,
    **कोल्हापूर** – ४१६ ०१२. मोबाईल नं. : ९८५००४६१५५ / ९७६७७ १७१९३
  - **नागपूर** : **प्रतिभा बुक्स डिस्ट्रिब्युटर्स**
    लोकरत्न कमर्शिअल कॉम्प्लेक्स, दुकान नं. ३, पहिला मजला, झांशी राणी स्क्वेअर, सीताबर्डी,
    **नागपूर** – ४४० ०१२. ☎ (०७१२) २५४७ १२९

www.pragationline.com info@pragationline.com

To Order ☞ E-mail : bookorder@pragationline.com Fax : (020) 24451538

# मनोगत

विद्यापीठाच्या तृतीय वर्ष वाणिज्य शाखेसाठी (टी. वाय. बी. कॉम.) असलेल्या **'भारतातील बँकविषयक कायदे आणि कार्यपद्धती'** या 'बँकिंग'(पेपर – ३) साठी असलेल्या अभ्यासक्रमात अत्यंत अभ्यासपूर्ण आणि वास्तव घडामोडींची दखल घेऊन काही महत्त्वपूर्ण सुधारणा करून संपूर्ण अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली आहे. या पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी जून २०१५ पासून झाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'बँकिंग' अभ्यासमंडळाने निर्धारित केलेल्या नवीन अभ्यासक्रमानुसार प्रस्तुत पुस्तक लिहिले आहे. विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी उपयुक्त असलेले हे पुस्तक आपल्या हाती देताना आम्हांस विशेष आनंद होत आहे.

आमच्या वाणिज्य शाखेसाठी लिहिलेल्या 'व्यावसायिक अर्थशास्त्र' विषयाच्या संदर्भ ग्रंथांना प्राध्यापक, विद्यार्थी, अभ्यासक व वाचक मित्रांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. वाणिज्य शाखेसाठी 'बँकिंग' विषयाची पुस्तके आम्ही लिहावीत अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली. त्यांचा आग्रह व निस्सीम प्रेमामुळे आमचा उत्साह द्विगुणित होऊन आम्ही प्रस्तुत पुस्तक लेखन केले आहे.

शैक्षणिक अधिकार मंडळाने 'बँकव्यवसाय आणि वित्तपुरवठा' (पेपर क्र. ३) : **भारतातील बँकविषयक कायदे आणि कार्यपद्धती** हा विषय अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे एका नव्या समावेशक अभ्यासक्रमाचे आव्हान ठेवले आहे, ही बाब खचितच अभिनंदनीय आहे. प्रस्तुत पुस्तकात संपूर्ण अभ्यासघटकांसंबंधी सविस्तर माहिती देत असताना प्रत्येक घटकाला योग्य न्याय मिळेल, विषय–विभागांची रचना तर्कनिष्ठ आणि आकलनीय राहील, अद्ययावत आकडेवारी योग्य प्रकारे तयार केलेल्या तक्त्यातून मांडली जाईल व विद्यार्थ्यांना योग्य आकलन होण्यासाठी विषयाची मांडणी त्यांना समजेल अशा सहज व सोप्या भाषेत करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी विद्यापीठाच्या परीक्षेच्या दृष्टीने दीर्घोत्तरी प्रश्न, लघुत्तरी प्रश्न व टीपा दिलेल्या आहेत.

सदर पुस्तकाचे लेखन करताना 'बँकिंग' अभ्यास मंडळाने शिफारस केलेल्या संदर्भ ग्रंथाबरोबरच इतरही अनेक दर्जेदार संदर्भ ग्रंथांचा वापर केला आहे.

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संस्थेच्या आदरणीय सरचिटणीस **मा. श्रीमती नीलिमाताई पवार** तसेच संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ यांच्या प्रेरणा व आशीर्वाद पाठीशी होते. म्हणूनच हे पुस्तक लिहिणे शक्य झाले. त्यांचे आम्ही ऋणी आहोत. त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या बी. सी. यू. डी. चे संचालक **डॉ. व्ही. बी. गायकवाड** यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व प्रोत्साहन यामुळे आम्ही सदैव त्यांचे ऋणी आहोत. पुणे विद्यापीठाच्या 'बँकिंग' अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. **मुलाणी** व सर्व सदस्यांचे आम्ही आभारी आहोत.

**प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे** (के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक); **प्राचार्य डॉ. एल. डी. भोर** (सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर) तसेच पुणे विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयांचे सन्माननीय प्राचार्य, प्राध्यापक व ग्रंथपाल या सर्वांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल व सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

पुस्तक लिहिण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल निराली प्रकाशनचे **श्री. दिनेशभाई फुरिया, श्री. जिग्नेशभाई फुरिया** तसेच व्यवस्थापक **महेश ना. साचणे** (पुस्तकनिर्मिती प्रमुख, मराठी विभाग) व नाशिक विभागाचे प्रतिनिधी **श्री. पराग घमंडी** यांच्या तत्पर सहकार्याबद्दल आम्ही सदैव ऋणी राहू.

निराली प्रकाशनमधील अक्षरजुळणीकार **श्री. नितीन भुतडा** यांनी उत्कृष्ट अक्षरजुळणी केल्याने पुस्तकास सुबकता व नीटनेटकेपणा आला. यांना साहाय्य म्हणून **सौ. स्नेहल गुळवणी** यांनी मुद्रितशोधनाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडली. **श्री. रवींद्र वाळोदरे** यांनी आकर्षक मुखपृष्ठ तयार केले. **श्री. दामोदरप्रसाद गौड** यांनी पुस्तकाची आकर्षक छपाई केली.

त्याबद्दल या सर्वांचे मनःपूर्वक आभार !

प्रस्तुत पुस्तकाचे विद्यार्थी व प्राध्यापक उत्स्फूर्तपणे स्वागत करतील याविषयी आम्हांस विश्वास आहे. या पुस्तकाच्या बाबतीत आपल्या काही सूचना असतील तर त्या जरूर कळवाव्यात. आपल्या सूचनांचे स्वागतच केले जाईल. मनःपूर्वक आभार !

**– लेखकवृंद**

**१ ऑक्टोबर, २०१५**
**(शके १९३७, भाद्रपद कृ. ४, संकष्टी चतुर्थी)**

# SYLLABUS

## BANKING AND FINANCE [Special Paper - III]

## BANKING LAW AND PRACTICES IN INDIA

**[Course Code : 306 - b] (From June 2015)**

**Term – I**

**1. LAWS RELATING TO BANKING IN INDIA**

- Provisions of the Banking Regulation Act, 1949 with reference to the following : Definition – Capital – Reserve Fund – Cash Reserve for Non-Schedule Banks.
- Liquid Assets – Licensing – Branch Licensing – Management
- Profit and Loss Account and Balance Sheet – Sec. 10, 29 & 30
- Powers of the Reserve Bank of India – Sec. 35 & 36
- Voluntary Amalgamation – Sec. 44-A
- Compulsory Amalgamation – Sec. 45.
- Liquidation – Sec. 45
- Banking Regulation Act as Applicable to Co-operative Banks

**2. NEGOTIABLE INSTRUMENTS ACT, 1881**

- Definition, Characteristics and Presumptions of Negotiable Instruments
- Promissory Note, Bills of Exchange and Cheque – Definitions and Features
- Parties to Negotiable Instruments
- Negotiation
- Presentment
- Notice of Dishonour
- Noting and Protesting

**3. PAYING BANKER**

- Precautions in Payment of Customer's Cheques
- Paying Banker's Duties and Rights
- Statutory Protection to Paying Banker
- Payment of Forged Cheque
- Return of Cheques

**4. COLLECTING BANKER**

- Precautions in collecting Customer's Cheques
- Collecting Banker's – Duties and Rights
- Statutory Protection to Collecting Banker
- Dishonour of Cheques by Non-Acceptance and Non-Payment

## Term – II

## 5. RELATIONSHIP BETWEEN BANKER AND CUSTOMER

- Definition of Banker and Customer
- Relationship of Debtor and Creditor
- Banker as Trustee
- Banker as Agent
- Banker's Obligation of Secrecy of Accounts
- Banker's Lien
- Right of Set-Off
- Disclosure Permitted by the Banker's Practices and Usage
- Bankers Obligation to Honour Cheques
- Garnishee Order
- Termination of Relationship

## 6. SECURITIES FOR ADVANCES

- Principles of Secured Advances
- Precautions to be taken by the Banker while Advancing against :
  - (a) Documents of Title to Goods
  - (b) Real Estate
  - (c) Fixed Deposit Receipt
  - (d) Bullion
  - (e) Supply Bills
  - (f) Life Insurance Policy
  - (g) Shares
  - (f) Agricultural Produce

## 7. MODES OF CREATING CHARGE

- Lien, Pledge, Hypothecation
- Mortgages and Types of Mortgages
- Precautions to be taken by Bankers while Creating and Recording Charge

## 8. PROJECT APPRAISAL AND RECOVERY MEASURES

**(A) Steps in Project Appraisal :**

Economic, Technical, Managerial, Operational and Financial Aspects

**(B) Recovery Measures**

(i) *Legal Measures :* Debt Recovery Tribunal – Lok Adalat – Corporate Debt.

(ii) *Non-Legal Measures :* Follow up action – One Time Settlement –
Recovery Camps – Recovering through Self Help Groups.
Recovery System – Recovery under Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2003

◇◇◇

# अनुक्रमणिका

## विभाग - I


**1. भारतातील बँकविषयक कायदे** **1.1 - 1.20**

**1.1 1949 च्या बँकव्यवसाय नियमन कायद्याच्या मुख्य तरतुदी**

1.1.1 व्याख्या

1.1.2 वसूल भांडवल आणि राखीव निधीविषयीच्या तरतुदी

1.1.3 तरल मालमत्ता/रोखे सुलभ मालमत्ता

1.1.4 बँकव्यवसायी कंपन्यांना परवाना देणे

1.1.5 बँकव्यवसायी कंपन्यांचे व्यवस्थापन

1.1.6 बँकांचे नफा-तोटापत्रक आणि ताळेबंद

1.1.7 भारतीय रिझर्व्ह बँकेला असलेले अधिकार

1.1.8 बँकव्यवसायी कंपन्यांचे एकत्रीकरण

1.1.9 बँकव्यवसायी कंपनीचे विसर्जन/समापन/व्यवसाय बंद करणे

**1.2 सहकारी बँकांना लागू होणारा बँकव्यवसाय नियमन कायदा, 1965**

**2. परक्राम्य संलेख कायदा, 1881** **2.1 - 2.18**

**2.1 परक्राम्य संलेख**

2.1.1 व्याख्या व अर्थ

2.1.2 वैशिष्ट्ये

2.1.3 पूर्वअटी/गृहीते

**2.2 परक्राम्य संलेखाचे प्रकार**

2.2.1 विनिमयपत्रे/विपत्रे : व्याख्या, वैशिष्ट्ये व प्रकार

2.2.2 वचनपत्रे : व्याख्या व वैशिष्ट्ये

2.2.3 धनादेश : व्याख्या व वैशिष्ट्ये

**2.3 परक्राम्य संलेखाचे पक्ष आणि त्यांचे दायित्व**

**2.4 संलेखाचे परक्रामण**

**2.5 सादरीकरण**

**2.6 परक्राम्य संलेखाचा अनादर**

**2.7 अनादराची नोटीस**

**2.8 नोंद आणि निषेध**

**3. प्रदायी बँक** **3.1 - 3.12**

3.1 ग्राहकाच्या धनादेशाची रक्कम अदा करताना घ्यावयाची काळजी
3.2 प्रदायी बँकेची कर्तव्ये आणि हक्क (अधिकार)
    3.2.1 प्रदायी बँकेची रेखांकित धनादेशाबाबतीतील कर्तव्ये
    3.2.2 प्रदायी बँकेचे हक्क/अधिकार
3.3 प्रदायी बँकेला असणारे कायदेशीर संरक्षण
3.4 बनावट धनादेशाचे प्रदान
3.5 धनादेश परत पाठविणे

**4. वसुली बँक** **4.1 - 4.8**

4.1 ग्राहकाच्या धनादेशाची वसुली करताना बँकेने घ्यावयाची काळजी
4.2 वसुलीदार बँकेचे हक्क आणि कर्तव्ये
    4.2.1 वसुलीदार बँकेचे हक्क
    4.2.2 वसुलीदार बँकेची कर्तव्ये
4.3 वसुली बँकेला असलेले कायदेशीर संरक्षण
4.4 धनादेशाचा अनादर
    1. अस्वीकृतीने अनादर
    2. पैसे न दिल्यामुळे अनादर

**विभाग - II**

**5. बँकव्यवसायी आणि ग्राहक यातील नातेसंबंध** **5.1 - 5.18**

5.1 बँकव्यवसायी (बँकर) आणि ग्राहक (कस्टमर) : व्याख्या
5.2 ऋणको आणि धनको यातील परस्परसंबंध
5.3 बँकव्यवसायी - एक विश्वस्त
5.4 बँकव्यवसायी - एक अभिकर्ता
5.5 खात्याच्या गुप्ततेसंबंधी बँकेवरील बंधने
5.6 बँकेचा धारणाधिकार
5.7 वजावटीचा अधिकार किंवा खाती एकत्रित करण्याचा अधिकार
5.8 बँकव्यवसायातील प्रथेनुसार खात्याच्या माहितीचे प्रकटीकरण
5.9 धनादेशाचा आदर करण्याबाबत बँकेवरील बंधने
5.10 कर्जमुक्ती आदेश
5.11 बँक आणि ग्राहक यातील संबंधाचा शेवट

## 6. अग्रिमांसाठी प्रतिभूती 6.1 - 6.14

**6.1 सुरक्षित/प्रतिभूत अग्रिमांची तत्त्वे**

**6.2 प्रतिभूतींच्या तारणावर कर्ज देताना बँकांनी घ्यावयाची दक्षता**

6.2.1 वस्तूच्या मालकीहक्काबाबतचे दस्तऐवज

6.2.2 स्थावर मालमत्तेच्या तारणावर कर्ज

6.2.3 मुदत ठेव पावती तारण

6.2.4 सोने-चांदी अलंकारांचे तारण

6.2.5 पुरवठा विपत्रे/बिल

6.2.6 आयुर्विमा पॉलिसी

6.2.7 भाग तारण कर्ज

6.2.8 शेतमाल

## 7. ताबा मिळविण्याच्या पद्धती/कर्जभार निर्माण करण्याच्या पद्धती 7.1 - 7.14

**7.1 धारणाधिकार, ताबेगहाण, नजरगहाण**

**7.2 गहाण आणि गहाणाचे प्रकार**

**7.3 कर्जभार निर्माण करताना आणि नोंदी करताना बँकांनी घ्यावयाची दक्षता**

## 8. प्रकल्प मूल्यमापन आणि कर्जवसुलीची साधने 8.1 - 8.27

**8.1 मुदती कर्जाची वैशिष्ट्ये**

**8.2 प्रकल्प मूल्यमापन प्रक्रिया**

**8.3 प्रकल्प मूल्यमापनातील टप्पे :**

1. तांत्रिक व्यवहार्यता
2. वित्तीय मूल्यांकन
3. आर्थिक व सामाजिक व्यवहार्यता
4. व्यवस्थापकीय बाजू
5. प्रकल्प मूल्यमापनाची कार्यात्मक बाजू

**8.4 कर्जवसुली उपाययोजना**

**(अ) बिगर-कायदेशीर साधने**

1. स्मरणपत्र पाठविणे
2. कर्जदाराच्या व्यवसायाच्या ठिकाणी किंवा राहत्या घरी भेटी देणे
3. कर्जवसुली मेळावे
4. व्यावसायिक कर्जवसुली प्रतिनिधींची नेमणूक
5. आजारी प्रकल्पांचे पुनर्वसन करणे

6. कर्जाची पुनर्रचना करणे
7. कर्जवसुली समेट घडविणे
8. थकबाकीदारांची यादी प्रसिद्ध करणे/जाहीर करणे
9. अनुदान खात्याची कर्जखात्याशी जोडणी करणे
10. अग्रिम रकमा परत मागविणे
11. थकीत कर्जखाती निकाली काढणे
12. विशेष शाखांमार्फत वसुली :
13. इतर साधने
14. एकरकमी कर्ज समायोजन योजना
15. स्वयंसहायता गटामार्फत कर्जवसुली

(ब) **कायदेशीर साधने**

1. न्यायालयीन प्रक्रियेमार्फत कर्जवसुली
2. 'कर्जवसुली' लवादामार्फत कर्जवसुली
3. लोक अदालत
4. निगम कर्ज पुनर्रचना
5. वित्तीय मालमत्ता व व्याज सुरक्षा कायदा, 2003

**✍ संदर्भ ग्रंथ** **R.1 - R.1**

■■■

विभाग - 1

# 1

# भारतातील बँकविषयक कायदे

## LAWS RELATING TO BANKING IN INDIA


**1.1 1949 च्या बँकव्यवसाय नियमन कायद्याच्या मुख्य तरतुदी**

1.1.1 व्याख्या

1.1.2 वसूल भांडवल आणि राखीव निधीविषयीच्या तरतुदी

1.1.3 तरल मालमत्ता/रोख सुलभ मालमत्ता

1.1.4 बँकव्यवसायी कंपन्यांना परवाना देणे

1.1.5 बँकव्यवसायी कंपन्यांचे व्यवस्थापन

1.1.6 बँकांचे नफा-तोटापत्रक आणि ताळेबंद

1.1.7 भारतीय रिझर्व्ह बँकेला असलेले अधिकार

1.1.8 बँकव्यवसायी कंपन्यांचे एकत्रीकरण

1.1.9 बँकव्यवसायी कंपनीचे विसर्जन/समापन/व्यवसाय बंद करणे

**1.2 सहकारी बँकांना लागू होणारा बँकव्यवसाय नियमन कायदा, 1965**

## प्रास्ताविक

भारतातील बँकव्यवसायाची उत्क्रांती पाहता भारतातील बँकव्यवसाय सावकारी, सराफी पेढ्या, मंदिर-बँका यांच्यामार्फत उदयास आला आहे. ब्रिटिश कालखंडात संयुक्त भांडवली संस्थांच्या स्वरूपात बँका सुरू होऊ लागल्या. सुरुवातीला असंघटित क्षेत्राकडून संघटित क्षेत्राकडे असा बँकव्यवसायाचा विकास होऊ लागला. ठेवी स्वीकारणारी, कर्जे देणारी, मौल्यवान वस्तूंचा सांभाळ करणारी अशी बँकांची कार्ये हळूहळू विस्तारू लागली. बँकांची अर्थव्यवस्थेतील भूमिका अतिशय महत्त्वाची असते. अर्थव्यवस्थेतील विविध व्यवहारांमध्ये सुसूत्रता आणण्यात बँका महत्त्वाची भूमिका पार पाडतात. अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर बँकांचे जाळे शहरी भागाकडून ग्रामीण भागाकडे विस्तारू लागते. बँका आर्थिक व्यवहारांचा कणा ठरतात, अर्थव्यवस्थेचा त्या एक आवश्यक भाग बनून जातात.

बँकिंग हा एक व्यवसाय आहे. त्याची स्वतःची अशी काही वैशिष्ट्ये आहेत. पैशाच्या व्यवहारांचा बँकांशी प्रत्यक्ष संबंध असतो. लोक विश्वासाने बँकांकडे ठेवी ठेवतात. या ठेवींच्या आधारे पतपैशाची निर्मिती करणे बँकांना शक्य होते. त्या आधारे बँका कर्जे देतात आणि नफा मिळवितात. सर्वसामान्यांचा बँकांवर असलेला विश्वास टिकून राहिला तरच बँकांचे व्यवहार सुरळीत चालतील. म्हणूनच बँकव्यवहारांचे नियमन होणे आवश्यक ठरते.

बँकविषयक कायदे अभ्यासणे म्हणजे बँकांच्या व्यवहारांच्या नियमनासाठी केलेल्या कायदेशीर तरतुदींचा अभ्यास करणे होय. बँकव्यवसाय नियमन कायदा हा त्यातील सर्वांत महत्त्वाचा कायदा आहे; ज्यात बँक व्यवहारातील विशिष्ट व्यवहाराविषयीच्या तरतुदी आहेत. आर्थिक व्यवहारांच्या संदर्भात असलेल्या सन 1956 च्या कंपनी कायद्याच्या, करार कायद्याच्या तरतुदींपेक्षा या तरतुदी वेगळ्या आहेत. सन 1934 च्या रिझर्व्ह बँक कायद्यानुसार रिझर्व्ह बँकेला भारतातील बँकांचे नियमन करण्याचा अधिकार देण्यात आला; पण ते पुरेसे नव्हते. म्हणून बँकांच्या व्यवहारांचे नियमन करणारा कायदा पास करण्यात आला.

सन 1949 चा बँकव्यवसाय नियमन कायदा हा बऱ्याच अंशी ब्रिटिश बँकिंग कायद्यावर आधारित आहे. सन 1913 च्या भारतीय कंपनी कायद्यात बँकांच्या संदर्भात काही तरतुदी केल्या; पण त्या पुरेशा नव्हत्या. त्यामुळे विस्तृत आणि योग्य तरतुदी असणारा बँकिंग कंपनी कायदा, 1949 पास करण्यात आला. सन 1966 मध्ये कायद्याचे नामकरण बँकव्यवसाय नियमन कायदा, 1949 (Banking Regulation Act, 1949) असे करण्यात आले. व्यवहारांच्या आणि अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार वेळोवेळी त्यात दुरुस्त्या करण्यात आल्या. बँक कायद्यामधील हा सर्वांत महत्त्वाचा कायदा आहे. यापूर्वी बँकिंग कंपन्यांचे व्यवहार भारतीय कंपनी कायदा, 1913 अनुसार नियंत्रित केले जात होते. बँकव्यवसायाची स्वतःची अशी वेगळी वैशिष्ट्ये असल्यामुळे स्वतंत्र असा कायदा करण्यात आला.

## सन 1949 च्या कायद्याची उद्दिष्टे (Objectives of the Law, 1949)

बँकव्यवसाय नियमन कायदा, 1949 हा फेब्रुवारी 1949 पासून लागू करण्यात आला. त्याची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

1. **सर्वसमावेशक कायद्याची गरज** : भारतात बँकव्यवसायाचे नियमन करणारा स्वतंत्र कायदा नव्हता. त्यापूर्वी बँकिंग व्यवसाय भारतीय कंपनी कायदा, 1913 च्या तरतुदीनुसार नियंत्रित केला जात होता. त्यात बँकव्यवसायासंबंधी काही तरतुदी होत्या पण त्या पुरेशा नव्हत्या. त्यासाठी स्वतंत्र अशा सर्वसमावेशक तरतुदी गरजेच्या होत्या.

2. **बँकांना बुडण्यापासून वाचविणे** : भारतात बँका बुडण्याचे प्रमाण अधिक होते. कारण पुरेसे भांडवल या बँकांकडे नव्हते. या कायद्यानुसार किमान भांडवलाचे प्रमाण ठरवून देण्यात आले. (कलम 11, 12 आणि 13)

3. **गळेकापू स्पर्धा टाळणे** : अनावश्यक व गळेकापू स्पर्धा टाळणे हा या कायद्याचा उद्देश आहे. त्यासाठी नवीन बँका सुरू करण्याविषयीच्या तरतुदी, बँकेची जागा किंवा ठिकाण बदलणे यांविषयी तरतुदी करण्यात आल्या.

4. **अर्थव्यवस्थेचा संतुलित विकास करणे** : भारतात बँकांचा विषमतेने विकास होत होता. बँकसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा या कायद्याचा एक उद्देश होता.

5. **बँक–कर्जांचे नियमन करणे** : या कायद्याने भारतीय रिझर्व्ह बँकेला काही विशेष अधिकार देऊन तिला अधिक सक्षम केले. त्यामुळे बँकांची कार्यपद्धती, कर्ज वितरण यावर नियंत्रण येऊ शकेल. कार्यक्षम प्रशासन व व्यवस्थापन निर्माण करण्यासाठी रिझर्व्ह बँकेला संचालक मंडळाच्या नियुक्तीसंबंधी आणि अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसंबंधी अधिकार देण्यात आले.

6. **ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करणे** : ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी व्याजदरनिश्चिती, कर्ज तारण प्रमाण, राखीव निधी, तरल मालमत्ता याविषयीच्या तरतुदी करण्यात आल्या; जेणेकरून बँकांना ठेवीदारांची रोख रकमेची मागणी पूर्ण करता यावी आणि त्यांच्या ठेवी सुरक्षित राखणे शक्य व्हावे.

7. **बँकव्यवसायाला सक्षम करणे** : बँकांचे सक्तीने एकत्रीकरण, समापन याविषयीच्या तरतुदींमुळे सक्षम बँकांचे प्रमाण वाढेल ही अपेक्षा या कायद्यामागे आहे.

8. **विदेशी बँकांचे व खाजगी बँकांचे नियमन करणे** : कायद्यात अशा काही तरतुदी आहेत की ज्यामुळे परकीय आणि खाजगी बँकांनाही भांडवल, कायदेशीर रोख निधी परवाना, गुंतवणूकविषयक धोरण आणि त्यांच्या कार्यपद्धती याविषयीचे नियम पाळावे लागतील. विशेषतः परकीय बँकांनी त्यांच्याकडील निधी विदेशाकडे वळवू नयेत यासाठी तरतूद आहे.

9. **बँक विसर्जनाची जलद आणि सुलभ पद्धती पुरविणे** : या कायद्यानुसार बँकांना त्यांचा व्यवसाय सुरू ठेवणे शक्य नसेल तर त्या बंद करण्यासाठी तरतुदी कायद्यात करण्यात आल्या.

**सन 1949 चा बँकव्यवसाय नियमन कायदा – एक दृष्टिक्षेप**

| विभाग | कलमे | वर्णन |
|---|---|---|
| I. | 1 ते 5 (अ) | प्राथमिक बाबी |
| II | 6 ते 36 (अ) | बँकिंग कंपन्यांच्या व्यवसायविषयक |
| II - A | 36 (अ–अ) ते 36 (अ–क) | नियंत्रण आणि व्यवस्थापन* |
| II - B | 36 (अ–ड) | काही विशिष्ट कार्यांना मनाई ** |
| II - C | 36 (अ–इ) ते 36 (अ–ज) | बँकांचे विलीनीकरण** |
| III | 36 (ब) ते 45 | बँकव्यवसाय बंद करणे आणि विसर्जन करणे. |
| III - A | 45 (अ) ते 45 (एक्स) | समापनाच्या प्रक्रियेचे सुलभीकरण व<br>जलद गतीने प्रक्रिया करणे. |
| IV | 46 ते 55 (अ) | इतर |
| V | 56 | सहकारी बँकांना बँक नियमन कायदा लागू *** |

* 1 फेब्रुवारी, 1964 पासून लागू.

** 1 फेब्रुवारी, 1969 पासून लागू.

*** 1 मार्च 1966 पासून लागू.

# 1.1 1949 च्या बँकव्यवसाय नियमन कायद्याच्या मुख्य तरतुदी
## MAIN PROVISIONS OF THE BANKING REGULATION ACT, 1949

### 1.1.1 व्याख्या (Definitions)

विविध तज्ज्ञांनी केलेल्या बँकेच्या व्याख्या आपण मागील वर्षी अभ्यासल्या आहेत.

'लॉ ऑफ बँकिंग' या आपल्या ग्रंथात एच. एल. हार्ट यांनी बँकेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे :

- ''ग्राहकांचा पैसा स्वीकारणे, त्याच्या धनाकर्षाची (Draft) वसुली करणे, त्यांच्या खात्यावर असलेल्या शिल्लक रकमेच्या मर्यादेत त्यांनी काढलेल्या धनादेशाचा स्वीकार करणे; अशा प्रकारे व्यवहार करणाऱ्या व्यक्तीस अथवा संस्थेस बँक म्हणावे.''

बँकव्यवसाय नियमन कायद्यात कलम 5 (1) मध्ये बँकिंग कंपनीची व्याख्या दिली आहे. त्यापूर्वी या कायद्यात भारतातील बँकव्यवसायाची उत्क्रांती स्पष्ट केली आहे.

बँकव्यवसाय नियमन कायदा, 1949; कलम 5 (ब) अनुसार,

- ''बँकव्यवसाय म्हणजे कर्जाऊ देण्याच्या हेतूने किंवा गुंतवणूक करण्याच्या हेतूने मागणी करताच अथवा अन्य प्रकारे परत करण्यायोग्य आणि धनादेश , धनाकर्ष, आदेश वा इतर मार्गांनी काढता येतील अशा पैशांच्या ठेवी अन्य लोकांकडून स्वीकारणे होय.''

या कायद्याच्या पोटकलम 5 (क) अनुसार,

- ''बँकिंग कंपनी म्हणजे भारतात बँकव्यवसाय करणारी कोणतीही कंपनी होय.''

याचा अर्थ, बँकव्यवसाय नियमन कायदा, 1949 च्या तरतुदीनुसार वस्तूच्या उत्पादनात गुंतलेली अथवा व्यापार करणारी आणि आपल्या व्यवसायाला वित्तपुरवठा व्हावा म्हणून ठेवी स्वीकारणारी कंपनी ही बँकिंग कंपनी होऊ शकत नाही.

सन 1949 च्या कायद्यात दिलेल्या बँकेच्या व्याख्येनुसार, बँकेची मुख्य वैशिष्ट्ये/कार्ये पुढीलप्रमाणे :

(1) सर्वसामान्यांकडून पैशाच्या स्वरूपातील ठेवी स्वीकारणे.

(2) स्वीकारलेल्या ठेवींच्या आधारे कर्ज देणे किंवा गुंतवणूक करणे. पण या पैशाचा कोणत्याही इतर व्यवसायासाठी वापर न करणे.

(3) ग्राहकाने किंवा ठेवीदाराने मागणी करताक्षणी पैसे परत करणे किंवा ठेवीच्या मुदतपूर्तीनंतर पैसे परत करणे.

(4) ग्राहकाने बँकेच्या पद्धतीनुसार लेखी स्वरूपात म्हणजे पैसे काढण्याची पावती किंवा धनादेश सादर केल्यासच पैसे परत करणे.

थोडक्यात, या कायद्यानुसार (अ) ठेवी स्वीकारणे आणि (ब) कर्ज देणे ही बँकेची मुख्य कार्ये आहेत.

याशिवाय सन 1949 च्या बँकनियमन कायद्यानुसार, कलम 6 अनुसार, बँकव्यवसाय कंपन्या पुढील व्यवसाय हाती घेऊ शकतात –

(1) विपत्र (Bills of Exchange) काढणे व वटविणे, खरेदी-विक्री करणे त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या हुंड्या, वचनपत्रे, समभाग, धनाकर्ष काढणे व वटविणे.

(2) पतपत्रे मंजूर करणे आणि प्रचलित करणे.

(3) प्रवासी धनादेश देणे-घेणे.

(4) मौल्यवान धातू आणि त्यांची नाणी यांची खरेदी-विक्री करणे.

(5) परकीय चलनाचे व्यवहार व खरेदी-विक्री करणे.

# Banking Law And Practices In India In Marathi




Publisher : Nirali Prakashan

ISBN : 9789351647713

Author : Pro. Dr. D. G. Usir, Pro. Dr. R. K. Datir, Pro. Dr. Smt. B. D. Patil, Pro. S. R. Javale, Pro. Dr. Aashalata Sonvade

Type the URL : http://www.kopykitab.com/product/21717

Get this eBook